MHBU190008822022

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.९८/२०२२**
**विनोद फकीरा पाडमुख –वि.– ग्रामसचिव तथा निबंधक जन्म–मृत्यू नोंद ग्रामपंचायत कार्यालय हिवरखेड पुर्णा, ता सिंदखेड राजा.**

## निशाणी क्र.०१ खालील आदेश

१. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज जन्म–मृत्यू अधिनियम १९६९ यामधील कलम १३(३) अन्वये सादर केलेला असून, अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जामध्ये अशी विनंती केली आहे की, ग्रामसचिव तथा निबंधक जन्म–मृत्यू नोंद ग्रामपंचायत कार्यालय हिवरखेड पुर्णा, ता सिंदखेड राजा, जि. बुलढाणा यांना असे निर्देष देण्यात यावेत की, त्यांनी अर्जदारांची मुलगी सान्वी विनोद पाडमुख हिच्या जन्माची नोंद दि.१३/०४/२०२० ही जन्म–मृत्यू नोंद रजिस्टरला घ्यावी.

०२. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने अर्जदार यांनी स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र (**नि.क्र.६**) सादर केले आहेत. अर्जदार यांनी त्यांचे पुराव्यात असे कथन केले की, त्यांची मुलगी नामे सान्वी विनोद पाडमुख हिचा जन्म दि.१३/०४/२०२० रोजी मौजे.हिवरखेड पुर्णा, ता. सिंदखेड राजा, जि. बुलढाणा येथे झाला. अर्जदार यांच्या मुलीच्या जन्माची नोंद नसल्याबाबत ग्रामपंचायत कार्यालय हिवरखेड पुर्णा, ता. सिंदखेड राजा, जि. बुलढाणा यांनी दिलेले अनुउपलब्धता प्रमाणपत्र (**नि.क्र.३/२**) सादर केले आहेत. निशाणी क्र.३/२ ची पाहणी केली असता, निश्चितपणे अर्जदार यांच्या मुलीच्या जन्माची नोंद शासकिय अभिलेखात नाही. परंतु, एखादे तथ्य दस्तऐवजावर उपलब्ध नसेल तर त्या अनुषंगाने दिलेला तोंडी पुरावा भारतीय पुरावा कायद्याचे कलम ५९ अन्वये स्वीकाराहृत आहे. सान्वी विनोद पाडमुख ही अर्जदाराची मुलगी

असल्यामुळे नैसर्गिकपणे कोणत्याही व्यक्तीला त्याच्या जवळच्या नातेवाईकांच्या जन्माच्या दिनांकाची माहिती असणे स्वाभाविक आहे. अर्जदार यांच्या मुलीचा जन्म हा कोराणा महामारीच्या काळात झाल्यामुळे त्या दरम्यानच्या कालावधीत त्यांच्या मुलीच्या जन्म नोंदणी कोणत्याही शासकिय कार्यालयात झाली नाही हा अर्जदाराचा पुरावा विश्वसनिय वाटतो. त्यामुळे अर्जदाराचे तोंडी पुराव्यावर अविश्वास ठेवण्याचे कोणतेही कारण माझे मते नाही.

०३. वरील विवेचनाअंती मी या निर्णयास पोहोचलो आहे की, अर्जदार यांचे मुलीचा जन्म दि.१३/०४/२०२० रोजी झालेला आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. ग्रामसचिव तथा निबंधक जन्म-मृत्यू नोंद ग्रामपंचायत कार्यालय हिवरखेड पुर्णा, ता सिंदखेड राजा, जि. बुलढाणा यांना असे निर्देश देण्यात येत आहेत की, त्यांनी अर्जदार यांची मुलगी सान्वी विनोद पाडमुख हिचा जन्म दि. १३/०४/२०२० रोजी झाला अशी नोंद जन्म-मृत्यू नोंदणी रजिस्टरला नियमानुसार विलंब शुल्कासह घ्यावी.

०३. या आदेशाची प्रत ग्रामसचिव तथा निबंधक जन्म-मृत्यू नोंद ग्रामपंचायत कार्यालय हिवरखेड पुर्णा, ता सिंदखेड राजा, जि. बुलढाणा यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

Digitally signed by SHINDE SATISH GANESHRAO
Date: 2023.06.15 17:30:32 +0530

दिनांक : १५/०६/२०२३ (सतिश ग. शिंदे)

स्थळ : सिंदखेड राजा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सिंदखेड राजा.

**प्रमाणपत्र**

मी, खात्रीपूर्वक कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे/न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – | श्री. दत्तात्रय मोहन मिरगे (ग्रेड–३) |
| न्यायालयाचे नांव | – | दिवाणी व फौजदारी न्यायालय, सिंदखेड राजा |
| दिनांक | – | १५/०६/२०२३ |

सिंदखेड राजा